# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.१/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २४/१२/२०२०

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

विषय :- ग्रामपंचायत निवडणुका २०२०-२०२१
संदर्भ:- आयोगाचे समक्रमांकाचे दि.११/१२/२०२० रोजीचे निवडणूक कार्यक्रम आदेश.

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सूपर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आयोगाच्या दि.११/१२/२०२० च्या आदेशान्वये माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींसाठी निवडणूक कार्यक्रम देण्यात आलेला असून नामनिर्देशनाची प्रक्रिया दि.२३/१२/२०२० पासून सुरू झाली आहे.

थेट सरपंच निवडणुकीसाठी सन २०१८ चा अधिनियम क्र.५४ दि.१३/०८/२०१८ च्या मुद्दा क्र. ५ मध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चा क्र.३ च्या कलम १३ (२ अ) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

“प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीकरिता किंवा पोट निवडणुकीकरिता नामनिर्देशन करण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकास, २१ वर्षांहून कमी वयाची नसेल, आणि जिचे मतदारांच्या यादीत नाव असेल, आणि जी १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली असेल आणि तिला या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरवलेले नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, तिच्याकडे किमान शालेय शिक्षणातील ७ वी इयत्तेची परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र असल्याखेरीज किंवा तिने सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे ७ वी

इयत्तेशी समतूल्य शैक्षणिक अर्हता असल्याखेरीज, सरपंच म्हणून निवडून दिली जाण्यास अर्ह असणार नाही".

सरपंचाची निवड थेट निवडणुकीऐवजी निवडून आलेल्या सदस्यांमधून करण्याकरिता सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२ अन्वये शासन राजपत्र प्रसिध्द करण्यात आलेले आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, कलम १३ च्या पोट कलम २ अ मधील **"सरपंच"** या शब्दाऐवजी **"सदस्य"** हा शब्द दाखल करण्यात येईल.

आयोगाने दि.११/१२/२०२० रोजी घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दि.२३ ते ३० डिसेंबर २०२० या कालावधीत नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या उमेदवारांना याबाबतच्या स्पष्ट सूचना देण्याचे निर्देश संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना देण्यात यावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- उपसचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.